145/विचौ
24/09/2026

संचालनालय लेखा व कोषागार
महाराष्ट्र राज्य, मुंबई-२०.

22 SEP 2026

प्राप्त झाले सही..........

<u>गोपनीय /नोंदणीकृत डाकेने/ई-मेल द्वारे</u>

**श्री.जितेंद्र कृष्णराव राऊत, तत्का. लेखाधिकारी यांना शासन सेवेत पुन:स्थापित करण्याबाबत.**

## महाराष्ट्र शासन

वित्त विभाग

शासन आदेश क्रमांक- विभाचौ-२०२६/प्र.क्र.४२/को.प्र.-१

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक

मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.

दिनांक :- २१ सप्टेंबर, २०२६.

0/8/9/2026/2426
24.9.2026

वाचा:-

१) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नागपूर यांचे क्र.जिपना/मुकाअ/७२४/२०२६, दि.२५.०३.२०२६ रोजीचे आदेश

२) शासनाचे समक्रमांकाचे दि .१३.०७.२०२६ रोजीचे कार्योत्तर मंजूरी आदेश.

३) शासनाचे समक्रमांकाचे दि .१३.०७.२०२६ रोजीचे ज्ञापन.

४) शासन निर्णय, सा.प्र.वि. क्र. निप्रआ ११२२/प्र.क्र.०९/विचौ-२, दि.२२.०४.२०२५.

<u>आदेश</u>

श्री.जितेंद्र कृष्णराव राऊत, तत्का. लेखाधिकारी, वित्त विभाग, जिल्हा परिषद, नागपूर यांना वाचा क्र.१ येथील मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नागपूर यांच्या दि.२५.०३.२०२६ रोजीच्या आदेशान्वये निलंबित करण्यात आलेले आहे. सदर आदेशास वाचा क्र.२ येथील या विभागाच्या दि.१३.०७.२०२६ रोजीच्या शासन आदेशान्वये कार्योत्तर मंजूरी देण्यात आलेली आहे.

२. श्री.जितेंद्र कृष्णराव राऊत, तत्का. लेखाधिकारी, वित्त विभाग, जिल्हा परिषद, नागपूर यांच्याविरुध्द वाचा क्र.३ येथील दि.१३.०७.२०२६ रोजीच्या ज्ञापनान्वये दोषारोप बजावण्यात आलेले आहेत.

३. वाचा क्र.४ येथील शासन निर्णय, सा.प्र.वि., दि.२२.०४.२०२५ अन्वये निलंबित शासकीय कर्मचा-यांच्या प्रकरणांचा आढावा घेण्याबाबत एकत्रित मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात आलेल्या आहेत. त्यानुसार, श्री. जितेंद्र राऊत यांना शासन सेवेत पुन:स्थापित करणे आवश्यक आहे.

४. त्यानुसार, श्री.जितेंद्र कृष्णराव राऊत, तत्का. लेखाधिकारी यांचे निलंबन संपुष्टात आणून त्यांना शासन सेवेत पुन:स्थापित करुन त्यांची *लेखाधिकारी, ग्रामविकास विभाग, मंत्रालय, मुंबई* येथे अकार्यकारी पदावर पदस्थापना करण्याचा निर्णय शिस्तभंगविषयक प्राधिकारी यांनी घेतला आहे.

५. त्यानुसार, श्री.जितेंद्र कृष्णराव राऊत, तत्का. लेखाधिकारी यांचे निलंबन त्यांच्याविरुद्धच्या फौजदारी खटल्यातील निर्णयाच्या व विभागीय चौकशीच्या अंतिम निर्णयाच्या अधीन राहून सदर आदेशान्वये संपुष्टात आणून त्यांना शासन सेवेत पुन:स्थापित करण्यात येत आहे.

६.	तसेच, श्री.जितेंद्र कृष्णराव राऊत, तत्का. लेखाधिकारी यांनी पदस्थापनेच्या ठिकाणी त्वरीत रुजू होऊन त्याबाबतचा रुजू अहवाल शासनास सादर करावा, अन्यथा त्यांची ही अनधिकृत गैरहजेरी म्हणून समजण्यात येईल.

हे आदेश तात्काळ अंमलात येतील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**( रुपाली कबरे )**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

श्री.जितेंद्र कृष्णराव राऊत, तत्का. लेखाधिकारी
(संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई यांच्यामार्फत)

**प्रत-**

(१) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र) १ व २ मुंबई/नागपूर.
(२) महालेखापाल (लेखा परीक्षा ) महाराष्ट्र) १ व २ मुंबई/नागपूर.
(३) अपर मुख्य सचिव (वित्त) यांचे स्वीय सहायक, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
(४) प्रधान सचिव (ले. व को.) यांचे स्वीय सहायक, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
(५) संचालक, लेखा व कोषागारे, महाराष्ट्र राज्य, मुंबई
(६) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नागपूर.*
(७) सह सचिव (आस्था), ग्रामविकास विभाग, मंत्रालय, मुंबई.*
(८) सहसंचालक, लेखा व कोषागारे, नागपूर विभाग, नागपूर *
(९) कक्ष अधिकारी (कोषा-प्रशा-२) वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
(१०) निवडनस्ती (कोषा-प्रशा-१)
(* संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई यांच्यामार्फत)